# सभासदांसाठी विशेष सूचना

१. बँकेस संलग्न असलेल्या प्रत्येक सोसायटीला आपल्या सभासदापैकी एकास प्रतिनिधी म्हणून या सभेला सोसायटीच्या पंच-कमेटीचा ठराव करुन ऑनलाईन पध्दतीने उपस्थित राहता येईल. सदर ठराव हे बँकेच्या मुख्य कार्यालयातील टपाल विभागामध्ये/संबंधित तालुका विकास अधिकारी कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये (सुट्टीचे दिवस वगळून) स्विकारले जातील. तसेच बँकेच्या **agm2021.adccbank@gmail.com** या ई-मेल द्वारे स्विकारले जातील.

२. पोटनियमाप्रमाणे या सहकारी संस्थांनी प्रवेश फी व शेअर्स रक्कम दि.३१.३.२०२१ पर्यत भरलेली असेल व ज्यांना या बँकेचे सभासद करुन घेतले असेल अशा सभासदानांच ऑनलाईन पध्दतीने सभेत भाग घेता येईल.

३. सभेपुढे ठेवलेल्या विषयाबाबतच्या माहितीची कागदपत्रे व मागील वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व मा.वैधानिक लेखापरिक्षक यांनी बँकेच्या ता.३१.३.२०२१ अखेर घेतलेल्या तपासणी अहवालास मा.संचालक मंडळाने केलेला खुलासा व दिलेली उत्तरे तारीख २०.०९.२०२१ पर्यत मुख्य कार्यालयात सुट्टीखेरीज इतर दिवशी कामाचे वेळेत पहावयास मिळतील.

४. कोणाही सभासदास या अहवाल वर्षाच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील, तर त्यांनी त्याबाबतचे लेखी प्रश्न दिनांक १८.०९.२०२१ पुर्वी कामाच्या वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात मिळतील अशा बेताने पाठवावेत. तसेच सदरचे प्रश्न बँकेच्या **agm2021.adccbank@gmail.com** या ईमेल वरही दि.१८.०९.२०२१ पुर्वी पाठविता येतील.

५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम क्रमांक २२ (क) प्रमाणे सभेला आवश्यक असलेली गणसंख्या जर दुपारी ठीक १.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीद्वारे पूर्ण झाली नाही, तर गणसंख्येअभावी सभा तहकुब केली जाईल व अशी तहकुब केलेली सभा पुन:श्च ऑनलाईन पध्दतीनेच त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने दुपारी ठीक १.३० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) मुळ विषय पत्रिकेवरील कामकाजाचा विचार करण्याकरीता भरेल व अशा सभेस गणसंख्या असण्याची आवश्यकता राहणार नाही.

६. क्रियाशील सभासद - बँकेच्या पोटनियम क्र.१५(१अ व २अ) मध्ये नमूद केल्यानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २६(२) (अ) च्या प्रोव्हीजनमध्ये 'बँकेच्या मागील सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याबाबतची असलेली अट शिथील करुन सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा अधिकार संस्थेच्या/बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस देण्यात आलेला आहे.

७. काही अपेक्षित परिस्थितीत उदा.बँकेचे काही तांत्रिक कारणामुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास तांत्रिक त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल. सभासदाच्या वैयक्तिक तांत्रिक त्रुटीबाबत बँक जबाबदार असणार नाही, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

८. कोरोना प्रादुर्भावाचा विचार करता सभासदांनी इच्छित स्थळी/बँकेच्या शाखांमध्ये उपस्थित राहून आपण सभेमध्ये सहभागी होण्याकरीता आपले आधारकार्ड/पॅनकार्ड झेरॉक्सवर आपला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी स्वत:ची स्वाक्षरी करुन जवळच्या बँकेच्या शाखेमध्ये प्रत्यक्ष जमा करावा. अथवा बँकेचा व्हॉटस् ॲप नं.८६०००३९७१३ वर कळवावा किंवा बँकेचा ई-मेल आयडी **agm2021.adccbank@gmail.com** या वर दि.२०.०९.२०२१ पुर्वी पाठवावा.

९. या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन उपस्थित राहणेसाठी सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर दि.२२.०९.२०२१ पासून एस.एम.एस./व्हॉटस् ॲप द्वारे सभेची लिंक पाठविली जाईल.

१०. इंटरनेट सुविधा उपलब्ध असणाऱ्या संगणक /लॅपटॉप/स्मार्टफोन या द्वारे सभासद या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.

नोंदणीकृत सभासदांना जर मिटींगच्या लिंकद्वारे लॉग-इन करण्यासाठी काही अडचणी असल्यास त्यांनी बँकेचे संगणक विभागाचे इनचार्ज श्री. संजय गुंडु, मोबा.क्रमांक ८६००१११२५१, श्री. ज्ञानदीप कुलकर्णी मोबा.क्रमांक ८६००१११२५६ किंवा श्री.जयंत देशपांडे मोबा.क्रमांक ९४२०९५३९४० यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.